आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२७ ऑक्टोबर २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- भारताचा सागरी दृष्टिकोन हा सुरक्षितता, स्थैर्य आणि आत्मनिर्भरतेवर आधारित असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन, मुंबईत इंडिया मेरिटाईम वीक परिषदेचं उद्घाटन

- दुसऱ्या टप्प्यात बारा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधे मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण करण्याची निवडणूक आयोगाची घोषणा

- मुंबई महानगरपालिका निवडणुकीत महायुतीतले घटक पक्ष एकत्रित निवडणूक लढतील असा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा विश्वास

- सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्याकडून पुढचे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या नावाची शिफारस

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ५६७ अंकांची वाढ

**<><><><>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज मुंबईत इंडिया मेरिटाईम वीकचं उद्घाटन केलं, तसंच माझगाव गोदीत खोल समुद्रात जाऊन मासेमारी करू शकणाऱ्या दोन नौकांचं लोकार्पणही त्यांच्या हस्ते झालं. याविषयी अधिक जाणून घेऊ या आमच्या प्रतिनिधीकडून....

***होल्ड... व्हीसी-***

*(भारताचा सागरी दृष्टिकोन हा सुरक्षा, स्थैर्य आणि आत्मनिर्भरता या तीन तत्त्वांवर आधारलेला असून गेल्या काही वर्षांतल्या सर्वसमावेशक सुधारणांमुळे भारत सागरी क्षेत्रातला एक महत्त्वाचा देश म्हणून उभा राहात आहे, असं प्रतिपादन अमित शहा यांनी आज इंडिया मेरीटाईम वीकच्या उद्घाटनप्रसंगी केलं. या कार्यक्रमात ८५ देशांचा सहभाग असल्याची माहिती केंद्रीय बंदरं, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी दिली. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनीही आज इंडिया मेरीटाईम वीकला संबोधित केलं. या पाच दिवसीय कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी राज्याच्या*

*बंदर विभागानं सागरी व्यापार क्षेत्रात ५६ हजार कोटी रुपयांचे १५ सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. यात दिघी आणि जयगड बंदरांचा विकास आणि विस्तार, नवीन जहाजबांधणी प्रकल्प उभारणं, स्वच्छ ऊर्जेवर चालणाऱ्या जहाजांची बांधणी, जलवाहतूक इत्यादी क्षेत्रातल्या सामंजस्य करारांचा समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.*

*केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते माझगाव गोदी इथं खोल समुद्रात जाऊन मासेमारी करायची क्षमता असलेल्या दोन नौकांचं लोकार्पणही झालं. यावेळी ते म्हणाले,*

***होल्ड... बाईट- अमित शहा***

*अशा आणखी १२ बोटी मासेमार सहकारी सोसायट्यांना लवकरच देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून, अंकिता आपटे.)*

**<><><><>**

मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण बारा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधे केलं जाणार असल्याचं निवडणूक आयोगानं आज जाहीर केलं. मतदारयाद्या अधिक पारदर्शक आणि निर्दोष करणं हे या पुनरीक्षणाचं उद्दिष्ट आहे, असं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं. दुसऱ्या टप्प्यात सखोल पुनरीक्षण टप्प्याटप्प्यानं राबवलं जाईल, असं ते म्हणाले. एकही मतदार या यादीतून वगळला जाऊ नये आणि चुकीची व्यक्ती यादीत समाविष्ट होऊ नये ही मतदार नोंदणी अधिकाऱ्याची जबाबदारी असल्याचं ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं....

**- -होल्ड - बाईट ज्ञानेश कुमार - -**

**<><><><>**

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत महायुतीची एकजूट भक्कम राहिल, असं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले. ते आज नागपूर इथं बोलत होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळे महाविकास आघाडीत फूट पडली असून त्यामुळे मतं विभागली जातील, अशी शक्यताही आठवले यांनी व्यक्त केली आहे. महापालिकेची निवडणूक ही महायुती जिंकेल या भीतीपोटी महाविकास आघाडी निवडणूक आयोगावर नाहक आरोप करत असल्याचंही आठवले यावेळी म्हणाले.

<><><><>

पंढरपूर येथील कार्तिकी शुद्ध एकादशी सोहळा २ नोव्हेंबर रोजी होणार असून या काळात प्रशासनानं स्वच्छतेला प्राधान्य द्यावं अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या आहेत. ते कार्तिकी यात्रा नियोजनाच्या आयोजन बैठकीत बोलत होते. यावेळी शिक्षण मंत्री दादा भूसे यांच्यासह इतर लोकप्रतिनीधी उपस्थित होते. कार्तिकी एकादशी सोहळ्यानिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या  हस्ते होणाऱ्या  शासकीय पूजेच्या वेळी ज्याप्रमाणे दर्शन रांगेतील भाविकाला सपत्नीक पूजेचा मान दिला जातो. त्याचप्रमाणे राज्यातल्या जिल्हा परिषद शाळांमधल्या दोन विद्यार्थ्यांनाही शासकीय महापूजेच्या वेळी मान मिळावा असं शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यावेळी सांगितले.

<><><><>

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी पुढील सरन्यायाधीश पदासाठी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नावाची शिफारस केली आहे. सरन्यायाधीश गवई येत्या २३ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असून त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत हे सरन्यायाधीशपदाची सूत्रं स्वीकारतील. या शिफारशीनंतर केंद्र सरकार त्यांच्या नावाची अधिसूचना जारी करेल. त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतील. न्यायमूर्ती सूर्यकांत यांना १४ महिन्यांचा कालावधी मिळणार असून ते ९ फेब्रुवारी २०२७ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.

<><><><>

भारतीय शेअर बाजारात वाढीचं सत्र आज पुन्हा सुरु झालं. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ५६७ अंकांची वाढ झाली आणि तो ८४ हजार ७७९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १७१ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ९६६ अंकांवर बंद झाला.

सेन्सेक्समध्ये नोंदणीकृत ३० कंपन्यांपैकी २२ कंपन्यांच्या समभागात आज वाढ झाली. यात दूरसंचार कंपन्यांचा प्रामुख्यानं समावेश आहे. त्याखेरीज खनिजतेल उत्पादक कंपन्या, उर्जा क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागांनीही वाढ नोंदवली.

<><><><>

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं एलव्हीएम -३ हे प्रक्षेपक वाहन श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातल्या लाँच पॅडवर पोहचवलं आहे. या प्रक्षेपक वाहनाची जुळवणी पूर्ण झाली असून ते २ नोव्हेंबरला अवकाशात प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या CMS 03 या दूरसंचार उपग्रहाशी जोडलेले आहे. हा उपग्रह भारताच्या महासागर क्षेत्रात संवाद वाढवेल आणि दुर्गम भागात डिजिटल सेवा उपलब्ध करून देईल.

**<><><><>**

अयोध्येमधल्या श्री राम जन्मभूमी मंदिराचं उर्वरित बांधकाम पूर्ण झाल्याचं श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टनं जाहीर केलं आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २५ नोव्हेंबर रोजी मंदिरावर झेंडा फडकावला जाईल.

**<><><><>**

गडचिरोलीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्ते आणि नेत्यांनी आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवधन सपकाळ यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. विधानसभेचे काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

**रत्नागिरी** आणि **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात गेले काही दिवस सुरू असलेल्या परतीच्या पावसाचा परिणाम शेती, मासेमारी आणि पर्यटन व्यवसायावर झाला आहे. बऱ्याच भागात शेतीची कापणी झाली नसल्यानं पावसामुळे भाताची रोपं आडवी झाली आहेत. समुद्रात येणाऱ्या वादळी वाऱ्यांमुळे मासेमारी आणि पर्यटन व्यवसाय ठप्प झाला आहे.

**सांगली** शहरासह जिल्ह्याच्या अनेक भागात संध्याकाळी जोरदार पाऊस झाला आहे. गेले काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे द्राक्ष बागायतदार चिंतेत असून बुरशी आणि रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणात औषध फवारणी केली जात आहे.

**<><><><>**

गेल्या २४ तासात कोकणात काही ठिकाणी जोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात

काही ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात विदर्भात बहुतांश ठिकाणी, कोकणात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**